# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १८९-२३** **दिनांक :- १४/०६/२०२३**

## ज्वेलरी शॉप मध्ये सोने खरेदी करणेचे बहाण्याने जाऊन सोनारास बोलण्यात गुंतवुन हात चलाखीने सोन्याचे दागिने चोरी करणा-या सराईत आरोपीतांना अटक विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०१/०६/२०२३ रोजी १६.०० वा. चे सुमारास फिर्यादी श्री. मोहन भगवान ओझा, वय ४७ वर्षे, हे त्यांचे वैभव ज्वेलर्स शॉप, विरार पुर्व येथे असतांना त्यांचे शॉप मध्ये अनोळखी महिला सोन्याचे दागिने विकत घेण्याचे बहाण्याने येऊन तक्रारदार यांना बोलण्यात गुंतवुन सोन्याचे दागिने चोरी केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ५३०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हया उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्याचे घटनास्थळ व आजुबाजुचे परिसरातील अंदाजे ५० ते ५५ ठिकाणचे सी.सी.टि.व्ही. फुटेजची पडताळणी करुन आरोपीतांनी गुन्हा करतेवेळी वाहनाचा वापर केला असल्याचे दिसुन आले. तद्नंतर सी.सी.टिव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाचे आधारे प्राप्त माहिती नुसार आरोपीत नामे बाळकृष्ण ज्ञानेश्वर गायकवाड व महिला आरोपी नामे श्रीमती ज्योती जसवंत सोलंकी दोन्ही रा. अंबरनाथ पश्चिम, ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करुन त्यांच्याकडुन चोरी केलेली मालमत्ता व गुन्हयात वापरलेले वाहन अशी एकुण ६,८८,९६०/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. अटक आरोपीतांकडे अधिक तपास करता त्यांनी खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा तपास पो.हवा. विशाल लोहार करीत आहेत.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा. रजि. क्र/कलम |
|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे | ५३०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,३४ प्रमाणे (मुळ गुन्हा) |
| २ | वालीव पोलीस ठाणे | ४५५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |
| ३. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ३४४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे |
| ४. | पालघर पोलीस ठाणे, जि.पालघर | ३३१/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३८० प्रमाणे |
| ५. | डहाणु पोलीस ठाणे, जि.पालघर | ३६/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |
| ६. | डहाणु पोलीस ठाणे, जि.पालघर | १७७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पो.नि. श्री. दिलीप राख (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अंम. सचिन बळीद, बालाजी गायकवाड, मोहसीन दिवाण, दत्तात्रय जाधव व प्रफुल सोनार तसेच परिमंडळ ३, विरार कार्यालयातील पो.हवा. नामदेव ढोणे, पो.अंम. सोहिल शेख यांनी केली आहे.

*********